दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २९६ वा ▶ मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## परवडत नसेल तर कांदा खाऊ नका: मंत्री भुसे



**नाशिक ।** केंद्राने कांदा निर्यात शुल्कात वाढ केल्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत. तर कांद्याच्या संभाव्य दरवाढीमुळे नागरीक चिंताग्रस्त झाले आहेत. त्यातच आता नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी कांद्याच्या दरवाढीवरून ओरड करणाऱ्यांना तो न खाण्याचा सल्ला दिला आहे. आपण १ लाखांची गाडी वापरतो. त्यामुळे १० - २० रुपये जास्त देऊन २० माल खरेदी करावा. ज्याला कांदा परवडत नाही, त्याने २-४ महिने कांदा खाल्ला नाही तर काही बिघडत नाही, असेही दादा भुसे यावेळी म्हणाले.

## न्यूज कॉलम

### आयशरची ट्रकला धडक; एक ठार

**धुळे ।** तालुक्यातील नेर गावाच्या शिवारात मिरचीची वाहतूक करणाऱ्या भरधाव वेगातील आयशरने पुढे चालणाऱ्या ट्रकला धडक दिली. सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात आयशर मधील सचिन रामभाऊ वानखेडे ( वय २२, रा. चिंचोली, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजी नगर ) हा तरुण ठार झाला. या प्रकरणी अपघाताला कारणीभूत ठरलेला आयशर चालक अफसर शेख ( वय ३०, रा. चिचोली ) याच्या विरोधात धुळे तालुका पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मुकटी गावात भरदिवसा घरफोडी

**धुळे ।** तालुक्यातील मुकटी गावात बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी भरदिवसा ऐवज लांबवला.धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये ५० हजारांची रोकड व २२ हजार रुपये किमतीचे दागिने यांचा समावेश आहे. सायंकाळी साडेसहा वाजता ही चोरी झाली. या प्रकरणी घरमालक युवराज देवराम पाटील यांच्या तक्रारीवरून धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंदुकीचा धाक दाखवित धुळ्यात दरोडा; दागिन्यांसह लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास

**धुळे । प्रतिनिधी**

बंदुकीचा आणि चॉपरचा धाक दाखवून शहरातील एका घरावर सशस्त्र दरोडा टाकण्यात आला. दरोडेखोरांनी सोन्याच्या दागिन्यांसह लाखो रुपये रोख हिसकावून नेले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार धुळे शहरातील पारोळा रस्त्यावरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पाठीमागे पंजाबी टिंबर मार्ट आहे. या ठिकाणी विनोद भसिन आणि त्यांचा मुलगा विशाल भसिन यांचे निवासस्थान आहे.

या निवासस्थानाच्या बाजूला असलेल्या पाण्याच्या टाकीवरुन दरोडेखोरांनी भसिन यांच्या घरात जाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना घरात शिरता आले नाही. यामुळे त्यांनी घराचा दरवाजा तोडला. पहाटे अडीच वाजता ही घटना घडली. पाचही दरोडेखोर भसिन यांच्या घरात शिरले. विनोद यांच्या डोक्याला बंदूक लावून त्यांना मारहाण केली. त्यांच्याजवळ झोपलेल्या १० वर्ष वयाच्या नातीलाही चॉपर लावला. 'आवाज करु नको' असा दम भरला. यावेळी त्यांनी कपाट आणि तिजोरीतील सोन्याचे दागिने आणि लाखो रुपये लुटले. यानंतर दरोडेखोरांनी आपला मोर्चा भसिन यांचा मुलगा विशाल याच्या खोलीकडे वळविला. विशाल आणि त्याच्या पत्नीला झोपेतून उठवून त्यांनी सर्वांना एका खोलीत बंद केले.आवाज करु नका, आम्ही वरच्या मजल्यावर जात आहोत असे सांगून दरोडेखोर घराबाहेर पडले. दरोडेखोरांनी चेहरा दिसू नये म्हणून माकड टोप्या घातलेल्या होत्या.

या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर जिल्हा अधीक्षक संजय बारकुंड, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक हेमंत पाटील, सहायक अधीक्षक तथा उपविभागीय अधिकारी ऋषिकेश रेड्डी, आझादनगर ठाण्याचे निरीक्षक नितीन देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी दरोडेखोरांनी हिसकाविलेल्या दागिन्यांपैकी दहा ग्राम वजनाचे सोन्याचे नाणे पोलिसांना मिळून आले. दरोडेखोर ज्या मार्गाने आले, त्याच मार्गाने परतल्याच्या काही खुणा पोलिसांना दिसल्या. एका दरोडेखोराने संपूर्ण लूट होईपर्यंत आपल्या हातात बंदूक ठेवली होती, अशी माहिती भसिन कुटूंबियांनी पोलिसांना दिली. हिंदी आणि अहिराणी भाषिक दरोडेखोर भसिन यांच्या कुटूंबियांची किमान जुजबी माहिती असलेले असावेत, असा प्राथमिक निष्कर्ष पोलिसांनी काढला आहे. या भिंतीकडे ठेवण्यात आलेल्या दोन पाण्याच्या टाक्यांजवळून दरोडेखोरांनी घरात प्रवेश केला असावा, असाही निष्कर्ष पोलिसांनी काढला आहे. चोरीस गेलेली एक मोटार सायकल पोलिसांना मिळून आली.



### दुचाकी तेथेच सोडली!

**१० ग्रॅमचे नाणेही सापडले दरोडेखोरांनी गुन्ह्यात वापरलेली एक काळ्या रंगाची शाईन मोटारसायकल बंगल्याच्या पाठीमागे मिळून आली. ती मोटारसायकल चोरीची असल्याचे समजते. तसेच घाईगडबडीत चोरट्यांकडून एक १० ग्रॅमचे नाणेही परिसरातच पडले. तेही पोलिसांनी पंचनामादरम्यान जप्त केले.**

**काही संशयीत ताब्यात? - पोलिसांनी तपासाला वेग दिला असून मोहाडी हद्दीतून काही संशयितांना ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. त्यांच्याकडून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न पोलीस करत असल्याचे समजते.**

### रात्री अडीच वाजेच्या सुमारास दरोडा

**धुळे बाजार समितीच्या पाठीमागेच विनोद भसीन यांचा बंगला व त्यांच्या मालकीचे पंजाबी सॉ मील (वखार) आहे. वरच्या मजल्यावर त्यांचे बंधू राज भसीन राहतात. तर विनोद भसीन खालच्या बाजूला राहतात. दरोडेखोरांनी मागील बाजूचा दरवाजा तोडून अगोदर किचनमध्ये प्रवेश केला. त्यानंतर ते विनोद भसीन यांच्या बेडरुममध्ये शिरले. यावेळी हातात बंदूक, चॉपर, हत्यार घेवून घरात शिरलेल्या दरोडेखोरांना पाहून विनोद भसीन पूर्णत: बिथरले. त्यांच्या समवेत त्यांची १० वर्षीय नातही होती. तिही रडायला लागली. दरोडेखोरांनी विनोद भसीन यांच्या कानावर बंदूक लावत त्यांना बेदम मारहाण केली. तसेच त्यांच्या नातीलाही चापट मारत 'आवाज करु नको' असा दम दिला.**

### ३५ ते ४० लाखांची लूट?

**कनपटीवर बंदूक आणि चॉपरचा धाक दाखवून दरोडेखोरांनी कपाट आणि तिजोरीत ठेवलेले सोन्याची नाणी, दागिने, हिरे, जवळपास ८ ते १० लाखांची रोकड लांबविली. दरोडेखोरांनी लुटीचा ऐवज लहान मुलाच्या बॅगेत भरली. लुटीत जवळपास ३५ ते ४० लाखांचा ऐवज लांबविल्याची शक्यता आहे. विनोद भसीन यांच्या पत्नीचे काही वर्षांपूर्वी निधन झालेले असल्याने त्यांचे नेमके किती दागिने होते; ते कुटुंबाला माहित नव्हते. त्यामुळे लुटीचा नेमका अंदाज अजूनपर्यंत कळालेला नाही.**

# मासे खा, डोळे चांगले होतात मग मुली पटतात
## गावितांचं वादग्रस्त विधान!



**धुळे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिंदे-फडणवीस-पवार महायुती सरकारमधील कॅबिनेट मंत्र्याच्या वक्तव्याने चर्चेला उधाण आले आहे. अभिनेत्री ऐश्वर्या राय दररोज मासे खायची. त्यामुळे तिचे डोळे आणि त्वचा सुंदर आहेत. तसे मासे खाऊन तुमचेही डोळे सुंदर होतील, असं मंत्री विजयकुमार गावित म्हणाले. विजयकुमार गावित हे नंदुरबारमधील भाजप नेते असून सरकारमध्ये आदिवासी विकास मंत्रिपदाची धुरा सांभाळत आहेत.

मासे खाल्ले ना, तर दोन फायदे आहेत. मासे खाल्ले की माणूस.. माणूस म्हणजे बाईमाणूस... चिकने दिसायला लागतात, डोळे तरतरीत दिसतात. कोणीही बघितलं तरी पटवूनच घेणार. कोणी ऐश्वर्या राय बघितली का, काय रे सांगितलं की नाही ऐश्वर्या राय, ही समुद्राच्या किनारी राहणारी, बँगलोरची, समुद्राच्या किनारी... ती दररोज मासे खायची, बघितले की नाही तिचे डोळे, तसे तुमचे पण होणार, आणि हा एक फायदा आहे, आपली जी स्कीन असते, कांती असते, चांगली दिसते, त्यात ऑईल असते, तेल असते, त्यामुळे डोळ्यावर चांगला परिणाम होतो. माशाच्या तेलामुळे शरीराची स्कीन चांगली दिसते, असं विजयकुमार गावित म्हणाले. धुळे जिल्ह्यातील अंतूर्ली येथे आदिवासी मच्छिमार बांधवांना मासेमारीचे साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजय कुमार गावित यांनी हे वक्तव्य केले. त्यावेळी मंचावर त्यांच्या कन्या डॉ. सुप्रिया गावितही उपस्थित होत्या.

डॉ. विजयकुमार गावित यांनी २०१९ च्या निवडणुकांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला होता. ते नंदुरबार विधानसभा मतदारसंघातून आमदार आहेत. आधी २००९ मध्ये आघाडी सरकार, मग २०१४ मध्ये फडणवीस सरकार आणि आता २०२२ मध्ये शिंदे सरकारमध्ये त्यांनी कॅबिनेट मंत्रिपद भूषवलं आहे.डॉ. विजयकुमार गावित यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप करण्यात आले आहेत. त्यांची कन्या हिना गावित या नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून भाजप खासदार आहे.

# कांद्यावरील निर्यातशुल्क दोन दिवसात रद्द करा!

### अन्यथा रास्तारोको : साक्रीत महाविकास आघाडीचा इशारा

**साक्री । प्रतिनिधी**



केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लादल्याने शेतकर्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात निर्यात शुल्क रद्द करावे, अन्यथा केंद्र व राज्य सरकारविरोधात जिल्हाभरात रास्तारोको आंदोलन केले जाईल, असा इशारा आज महाविकास आघाडीने दिला. यासंदर्भात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते आज सकाळी घोषणाबाजी करत तहसील कार्यालयावर पोहचले. यावेळी तहसीलदार भाऊसाहेब सोनवणे यांना निवेदन देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, उन्हाळी कांदा शेतकर्यांकडून कांदा चाळीमध्ये पाच ते सात महिने सांभाळला जातो. गेल्या काही दिवसात कांदा चाळीमध्ये प्रचंड नुकसान झालेले आहे. तथापि, पंधरा दिवसांपासून कांद्याला थोडाफार भाव मिळत असल्याने शेतकर्यांमध्ये समाधानाचे वातावरण होते. मात्र, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के जादा निर्यात शुल्क लावल्याने व्यापारी बांधवांनी खरेदी व निर्यात बंद केली. परिणामी, शेतकर्यांना भाव मिळत नसल्याने शेतकर्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. केंद्र सरकारच्या या शेतकरीविरोधी कृतीचा आम्ही तिव्र निषेध करतो. येत्या दोन दिवसात निर्यात शुल्क रद्द करावे, अन्यथा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकर्यांकडून केंद्र व राज्य सरकारविरोधात रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून दिला आहे.

निवेदन देतेवेळी राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष जितेंद्र मराठे, किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष उत्तमराव देसले, माजी जि.प. कृषी सभापती सचिन बेडसे, जिल्हा सरचिटणीस नरेंद्र तोरवणे, उबाठा शिवसेना तालुका प्रमुख पंकज मराठे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भानुदास गांगुर्डे, दिनेश बोरसे, अॅड.वाय.पी. कासारे, अॅड.सुनील नांद्रे, संदीप भोसले, मुकेश शिंदे, सयाजीराव ठाकरे, गिरीश नेरकर, विलास देसले, प्रकाश पाटील, किरण देवरे, दीपक साळुंखे, सचिन सोनवणे, कपिल जाधव, सागर देसले, अॅड. मनिष सोनवणे, प्रज्योत देसले, किशोर पाटील, रविंद्र देसले, गोविंदराव देवरे, संभाजी नांद्रे, कल्पेश सोनवणे, अॅड.मनिष सोनवणे, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# आमदारांच्या तक्रारीनंतर वरिष्ठ पोलीस अधिकारी धुळ्यात दाखल

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे शहराचे आमदार फारुक शहा यांनी विधानसभेत केलेल्या तक्रारीनंतर पोलीस प्रशासनाचे अपर महासंचालक संजय सक्सेना, नाशिक परिक्षेत्राचे विशेष महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर पाटील आज धुळ्यात आले. जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वार्षिक तपासणीसह, जिल्हा पोलीस प्रशासनातील कामकाजाबाबतही आढावा घेण्यात येणार आहे.

धुळे जिल्हा पोलीस प्रशासनात गेल्या काही दिवसांपासून विविध कारणामे सुरू आहेत. या संदर्भात चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आमदार फारुक शाह यांनी अधिवेशन काळात विधान सभेत केली होती. त्यासाठी लक्षणीय उपोषणही केले होते. त्यानुसार चौकशी करण्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणाही केली होती, त्यानुसार विशेष पोलीस महानिरीक्षक शेखर पाटील येणार असल्याची माहिती ही आमदार शाह यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली होती. त्यानुसार अपर महासंचालक सक्सेना यांच्यासह शेखर पाटील धुळे शहरात आज दाखल झाले. धुळे जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे अधीक्षक संजय बारकुंड यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. श्री. सक्सेना यांच्याकडूनक्षपोलीस प्रशासनातील वार्षिक तपासणी होणार आहे. तर शेखर पाटील यांच्याकडून पोलीस प्रशासनातील विविध कारनामे संदर्भात चौकशी करण्याची शक्यता आहे. यावेळी आमदार शाह यांच्याकडूनही आपले म्हणणे मांडण्यात येणार आहे. दरम्यान, धुळे जिल्हा पोलीस प्रशासनात गेल्या काही दिवसांमध्ये चांगलीच उलथा पालथ झालेली आहे. अधीक्षक बारकुंड यांच्या सोबतीने प्रत्येक कारवाईत अग्रेसर असलेले एलसीबीचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांची एकाच दिवसात तडका फडकी पोलीस नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली. एलसीबीचे काम सध्या अधीक्षक बारकुंड हे स्वतः पाहत आहेत.

# महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेकडून मोदी सरकारचा जाहीर निषेध




**दहिवेल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटने कडून दहिवेल कृषी बाजार समितीत ४० टक्के निर्यात शुल्क वाढविल्याबद्दल जाहीर निषेध करण्यात आला.

२०१४ पासून देशात भारतीय जनता पार्टीचे सरकार आल्यापासून नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून शेतकऱ्यांच्या मालाला कोणत्याही प्रकारचा योग्य भाव नसून आत्ताच कुठेतरी शेतकऱ्यांना दोन पैसे मिळत असताना मोदी सरकारने ४० टक्क्यांनी वाढवून भाव कमी करण्याचे कटकारस्थान रचले आहे. मागील काही दिवसात नाफेड चा कांदा बाजारात आणू अशी अफवा पसरवून व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करून भाव पाडण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी ठरला. त्यामुळे यावेळी निर्यात शुल्क ४० टक्क्यांनी वाढवून कांद्याला भाव कमी करण्याचा प्रयत्न या मोदी सरकारचा आहे. भारतीय जनता पार्टीला फक्त शहरी मतदारांचे मत हवीत का. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मतं नकोत का असा प्रश्न ग्रामीण भागातील मतदारांना पडला आहे. दि २१ रोजी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटने कडून या निर्णयाविरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे तालुका उपाध्यक्ष संजय बच्छाव व सामाजिक कार्यकर्ते डोंगरु बहिरम तसेच संपूर्ण व्यापारी वर्ग व पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलाठी परीक्षेत यंत्रणा फेल : अनेक केंद्रांवर सर्व्हर डाऊन; हजारो विद्यार्थ्यांचा खोळंबा

तलाठी भरती प्रक्रियेतील सावळा गोंधळ काही संपण्याचे नाव घेत नाही. काही दिवसांपूर्वीच नाशिकमध्ये पेपर फुटीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर आता काल तलाठी परिक्षा असलेल्या अनेक केंद्रांवर सर्व्हर डाऊन झाल्याने मुलांचा खोळंबा झाला आहे. प्रशासनाच्या या भोंगळ कारभारावर विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

राज्यात तलाठी भरतीसाठी परीक्षा सुरू आहेत आणि या परीक्षेत काल सर्व्हरचं विघ्न उभं राहिलं होतं. सर्व्हरच्या तांत्रिक बिघाडामुळे परीक्षा वेळेवर सुरू झाल्या नाहीत. त्यामुळे राज्यातील नागपूरसह अकोला, छत्रपती संभाजीनगर, लातूर आदी अनेक परीक्षा केंद्रावर प्रचंड गोंधळ झाला.सकाळी ९ वाजता परीक्षा सुरू होणार होती मात्र, सर्व्हर डाऊन मुळे विद्यार्थ्यांना १० वाजता परीक्षा केंद्रात सोडण्यात आले त्यानंतर १०.३० वाजता परीक्षा सुरू झाली. पहिला पेपर उशीर झाल्याने दुपारचं वेळापत्रक कोलमडले होते. गेले चार दिवस राज्यात तलाठी पदासाठीची ऑनलाईन परीक्षा सुरू आहे.रोज परीक्षा ही तीन सत्रांमध्ये घेतली जाते. पहिले सत्र सकाळी ९ ते ११, दुसरे सत्र दुपारी १२.३० ते २.३० आणि तिसरे सत्र सायंकाळी ४.३० ते ६.३० या वेळेत होते. ऑनलाइन परीक्षेत बहुपर्यायी प्रश्नपत्रिका परीक्षार्थींना सोडवावी लागते. राज्यभरात १७ लाखापेक्षा जास्त परीक्षार्थी यंदा तलाठी पदासाठीच्या परीक्षेसाठी बसलेले आहे. त्यामुळे ही परीक्षा राज्यभरातील विविध केंद्रांवर अनेक दिवस घ्यावी लागत आहे. ऑनलाइन परीक्षेसाठीचा सर्व्हर डाऊन झाल्यामुळे पहिल्या सत्राची परीक्षा वेळेत सुरू झाली नाही. या आधी नाशिकमध्ये तलाठी भरतीच्या परीक्षेत हायटेक कॉपीचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे य़ापुढे तरी तलाठी परीक्षा निर्विघ्नपणे पार पडतील, का, असा प्रश्न तलाठी पदाचे परीक्षार्थी विचारत आहेत.

**अधिक धागेदोरे लागले असते हाती**

नाशिकमधील घटनेची माहिती मिळताच जर राज्य सरकारने वेळीच ठोस पाऊल उचलले असते तर यामागील मोठे रॅकेट हाती लागू शकले असते.तसेच हा संशयित ज्यांना कॉपी पुरवत होता ते देखील सापडण्यास मदत झाली असती.



### भोंगळ कारभारावर सर्वत्र संताप

**इंटरनेट चालत नसल्याने विद्यार्थ्यांना बाहेर ताटकळत थांबावे लागले. याबाबत प्रशासनाकडून सॉफ्टवेअर अपडेट होत असल्याचे सांगण्यात येत होते. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच नाशिकमध्ये तलाठी भरती प्रतिक्रियेत हायटेक कॉपीचा प्रकार समोर आला होता. वॉकीटॉकीच्या साहाय्याने पेपर फोडण्यात आल्याचे प्रकरण समोर आले होते. ज्यानंतर प्रशासनाच्या भोंगळ कारभारावर सर्वत्र संताप व्यक्त केला जात होता.**

### अनेक परीक्षांमध्ये घोटाळे उघडकीस

**महाराष्ट्रात नोकरभरती घोटाळे सुरू असून, वन विभाग, मुंबई पोलीस भरती ई. पेपर फुटलेले आहेत. तलाठीची परीक्षा समोरच असून, पेपरफोड्या थांबविण्यासाठी राजस्थानच्या धर्तीवर पेपरफुटी कायदा करावा व परीक्षेचे शुल्क कमी करण्याची मागणी, सरकार दरबारी मांडण्याची मागणी यावेळी विध्यार्थ्यांनी पटोले यांच्याकडे केलेली आहे.**



शोध बातमी
**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

# महाराष्ट्र शासनाची पत्रकार अधिस्वीकृती समिती रद्द!

**धुळे । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेवर सन २००८ पासून प्रशासक नियुक्त असून,एस.एम.देशमुख आणि त्यांचे पंटर हे स्वयंघोषित अध्यक्ष आणि पदाधिकारी असल्याचे अनेकदा उघड झाले आहे. त्यांनी शासनाची फसवणूक केली म्हणून त्यांना अटक करण्यात यावी. अशी मागणी व्यंगचित्रकार प्रशांत आष्टीकर यांनी केली आहे.

महाराष्ट्रात बोगस मराठी पत्रकार परिषद चालवणारा एसएम देशमुख याची गुन्हेगारी सन २०१९ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना प्रशांत आष्टीकर यांनी अनेकदा उघड केली. तत्कालीन माहिती महासंचालक दिलीप पांढरपट्टे यांनी चौकशी लावून अक्कलकोटच्या मेळाव्यात जाण्याचे देशमुख यांनी टाळले.महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जीआर मध्ये मराठी पत्रकार परिषदेवर हायकोर्टाने प्रशासक बसवल्याचे नमूद केले आहे. हा जीआर सदोष असल्यामुळे आणि महाराष्ट्रातील अनेक पत्रकार संघटनांचा विरोध झाल्याने ही समिती शासनाने गुंडाळून ठेवलेली आहे. तरी शासनाची फसवणूक करणारा आरोपी एस. एम. देशमुख आणि त्यांच्या विभागीय साथीदारांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी. अशी मागणी अष्टीकरांनी केली आहे.

## दात आहेत पण..!

राज्याच्या अनेक भागात पावसाची रिपरिप सुरु आहे. वातावरण ढगाळ आहे. अनेक भागात अस्वच्छतेचा प्रकोप आढळतो. हे वातावरण साथीच्या रोगांना पूरक आहे. त्यांचा फैलाव होत आहे. डोळे येण्याची साथ आहे. लाखो लोक त्याने पीडित आहेत. डेंग्यू डोके वर काढत आहे. त्याचा संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या वाढत आहे. उपचारांसाठी राज्यातील लाखो लोकांना सरकारी आरोग्य व्यवस्थेचा आधार घ्यावा लागतो. त्यांच्या आर्थिक अस्थिरतेमुळे त्यांच्याकडे दुसरा पर्याय नसतो. कदाचित त्यामुळे सरकारी रुग्णालये गर्दीने ओसंडून वाहतांना आढळतात. तथापि सरकारी आरोग्य व्यवस्थेला अनारोग्याची बाधा झाली आहे.

हा संसर्ग बळावतच आहे. उपचारांच्या आशेने जाणाऱ्या रुग्णांना त्याचा विपरीत परिणाम सहन करावा लागतो. राज्याचा काही भाग दुर्गम तर काही भाग अतिदुर्गम आहे. सगळ्याच ठिकाणी शासकीय आरोग्य सेवा पोहोचलेली नाही. प्रसंगी तेथील लोकांच्या गैरसोयीची तीव्रता जास्त असते. दवाखाने नाहीत, असतील तेथे पोहोचण्यासाठी रस्ते नाहीत, त्यामुळे वाहन उपलब्ध नसणे अशा अनेक समस्यांना त्यांना नेहमीच सामोरे जावे लागते. जिथे आरोग्य केंद्रे नाहीत तेथे आरोग्यवर्धिनी केन्द्रे सुरु करण्यात आली आहेत. सार्वजनिक सेवा गरजूंपर्यंत पोहोचवणे हा उद्देश असल्याचे सांगितले जाते. राज्यात सुमारे दहा हजारांपेक्षा जास्त केंद्रे सुरु झाली. केंद्रामधून तेरा प्रकारच्या सुविधा दिल्या जातील असे सरकारने जाहिर केले होते. तथापि त्यातील दोन हजारांपेक्षा जास्त केंद्रांमध्ये पूर्णवेळ डॉक्टर उपलब्ध नसल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे.

त्या केंद्रांवरील सेवांचा भार इतरत्र कार्यरत असलेल्या डॉक्टरांना वाहावा लागतो असेही वृत्तात म्हंटले आहे. मुळात सरकारी रुग्णालयात एरवीही रुग्णांची प्रचंड गर्दी असते. साथीच्या रोगाच्या काळात त्यात वाढ होते. अशा काळात डॉक्टर उपलब्ध नसलेल्या केंद्रातील अतिरिक्त सेवांचा भार पेलणे दुसऱ्या केंद्रात कार्यरत असलेल्या एका डॉक्टरला शक्य होऊ शकेल का? म्हणजे त्यांचा परिणाम पुन्हा रुग्णांनाच सहन करावा लागू शकेल. लागत असेलही. अनेक रुग्णांना उपचाराविना घरी परतावे लागत असेल. हा रुग्णांचा दोष आहे का? आरोग्यवर्धिनी केंद्र योजना केंद्र सरकारची की राज्य सरकारची याच्याशी रुग्णांना देणेघेणे असू शकेल का? सरकार लोकांसाठी चालवत असलेल्या आरोग्य केंद्रामध्ये गरजेच्या वेळी विनासायास उपचार मिळावेत एवढी साधी त्यांची अपेक्षा. ग्रामीण भागात आरोग्यसेवेची जास्त गरज पण सुविधांचा अभाव आणि दुर्लक्षही वाढते. ते लोक यंत्रणेपर्यंत सहज पोहोचू शकत नाहीत. त्यांना दुसरा पर्याय देखील नाही.

सुविधा निर्माण करताना त्यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी देखील निश्चित का केली जात नसावी? सरकारी आरोग्य सेवेच्या उप्लब्धतेबाबत शहरी आणि ग्रामीण असा भेद होऊ शकेल का? तथापि शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागातील लोकांना कार्यक्षम आरोग्य सेवेची गरज जास्त आहे हेही नाकारता येऊ शकेल का? सरकार अनेक योजना जाहीर करते. त्यांचे उद्देशही लोककल्याणचे असतात. पण बहुतेक सरकारी योजनांचे घोडे कुठे पेंड खाते हे सरकारला अजूनही शोधता आले नसेल का? योजना आणि अंमलबजावणी यांचे नियोजन न करताच लोकप्रियतेसाठी योजना जाहीर करण्याची घाई केली जात असावी का? अमलबजावणी न झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची? अकार्यक्षम सेवकांवर कारवाई केली जाते का? जनतेच्या निदान ऐकिवात तरी नाही. करोना महामारीने सरकारी आरोग्य व्यवस्था बळकटीची गरज तीव्रतेने जाणवून दिली. आरोग्य तंज्ञानी सरकारचे वारंवार लक्षही वेधून घेतले. तसे कधी घडेल? तोपर्यंत लोकांची अवस्था 'दात आहेत पण चणे नाहीत' अशीच असेल का?

## जगप्रसिद्ध ३२ शिराळा नागपंचमी

गोरक्षनाथ महाराजांनी इसवी सन आठव्या शतकात शिराळ्यात वास्तव्यास असताना जिवंत नागाच्या नागपंचमीची परंपरा सुरू केली. ही परंपरा दशग्रंथी ब्राह्मण महाजन (सध्या पांडुरंग लक्ष्मण महाजन) यांच्या घरापासून सुरू झाली. आजही परंपरागत नागदेवतेची पालखी प्रणव पांडुरंग महाजन यांच्या घरातून निघते. या पालखीची तयारी आठ दिवस आधीपासून सुरू होते. शिराळा ग्रामदेवतेचे पुजारी गुरव अमावसेच्या दिवशी मूर्तीची लिंबू, माती, रांगोळी आणि राख यांच्या सहाय्याने स्वच्छता करतात. त्यानंतर नागपंचमीच्या आदल्या दिवशी भास्कर महाजन मूर्ती ब्रासो वापरून स्वच्छ चकचकीत करतात. या कामी पांडुरंग महाजन, प्रणव महाजन, अनिरुद्ध महाजन, प्राजक्ता महाजन व अपूर्वा महाजन मदत करतात. त्याला ठरलेल्या पारंपरिक मनमोहक रंगांनी रंगवतात. नागपंचमीच्या दिवशी परंपरागत पालखी भोई बांधवकडून तोरणा ओढ्याला स्वच्छ धुतली जाते. त्यानंतर पालखीची सजावट पारंपरिक वस्त्रालंकारांनी केली जाते. सकाळी अकरा वाजता पालखीचे मनोभावी मंत्रोपचाराने विधिवत पूजा केली जाते.आधी जिवंत नागाची पूजा करण्याची परंपरा होती, पण सध्या फक्त मूर्तीची पूजा केली जाते. यानंतर पालखीचे मानकरी पांडुरंग महाजन यांच्या घरी प्रथम पूजन पूर्ण होते. यानंतर गुरुवार पेठ मार्गे पालखी सोमवारपेठेतील मरिमी आईच्या मंदिरात प्रथम पूजेसाठी जाते. त्यानंतर ग्रामदैवत अंबाबाईच्या मंदिरात पालखीची पूजा होते.

सायंकाळी पालखी कासारगल्ली मार्गे, वैजेश्वर मंदिरात जाते, तिथे तिचे पूजन होते आणि रात्री उत्तर पूजेसाठी पालखी परत पांडुरंग महाजन यांच्या घरी येते. शिराळा गावातील या परंपरेमध्ये सर्व समाजाने बारा बलुतेदारांना सहभागी होण्याची परंपरा आहे. यामध्ये पालखी उचलण्याचा मान भोई लोकांचा आहे. नागाचा मान कोतवालांचा आहे. पालखी आणि नागाची पूजा करून नागपंचमीची सुरुवात करण्याचा मान महाजनांचा आहे. पालखीमधील नागदेवतेची मूर्ती ही जागृत देवस्थान आहे. नवसाला पावण्याची अखंड परंपरा गेली कित्येक वर्षे सुरू आहे.

**विदर्भातला नागपंचमी सण**

नागपंचमी हा विदर्भात साजरा केला जाणारा मोठा सण आहे. तसे नागपंचमी सर्वच ठिकाणी साजरी केली जाते. श्रावण पंचमी



या दिवशी नागदेवतेची पूजा घरोघरी केली जाते. विवाहित मुली आपल्या माहेरी आलेल्या असतात. गावामधील बाल मैत्रिणींची भेट, बोलणे, त्यांच्यासोबत खेळणे. झाडाला झोके बांधून झोक्यावर झुलणे असे सर्व गमती जमतीचे वातावरण असते. लहान गावात किंवा खेड्यात नागपंचमीच्या दिवशी सुवासिनी सुस्नान करून नागोबाच्या पूजेकरिता लाह्या, फुटाणे, दूध, केळी, फुलांचे हार इत्यादी साहित्य घेऊन नागाच्या वारुळावर जाऊन वारुळाची पूजा करायचे. नैवेद्य दाखवून प्रसाद घेऊन घरी येऊन पूर्णा वरणाचा स्वयंपाक करून नैवेद्य दाखवून मग सर्वांनी भोजन करायचे. जवळपास कुठे नागदेवतेचे मंदिर असल्यास तिथे जाऊन दर्शन घ्यायचे. नाग देवतेचे मंदिर नसेल तर शिवालयात जाऊन नमस्कार करायचा. सायंकाळी भजन करत, गाणे म्हणत आनंदाने हा उत्सव साजरा केला जातो. खेड्यापाड्यात प्रमुख व्यवसाय हा शेतीच असतो. शेतात काम करत असताना अनेकदा नागाचे, सापाचे दर्शन होणे हे स्वाभाविक आहे. कधी कधी दंश होण्याची सुद्धा शक्यता असते. जुन्या काळी गावोगावी दवाखाने नसतं किंवा जाणते वैद्य देखील क्वचितच आढळत. त्यामुळे नागाची पूजा करून त्याला अभय मागण्याची प्रथा पडली. अशावेळी काही विशेष अभ्यासू मंडळी झाडपाल्याद्वारे किंवा मंत्र विद्येच्याद्वारे विंचू किंवा साप चावल्यास इलाज करीत असत. या मंत्राच्या आणि झाडपाल्याद्वारे इलाज करणाऱ्या मंडळींना आरवाडी असे म्हणतात. (शुद्ध शब्द आरवाडी/ ग्रामीण शब्द अरबडे, अरबडी) ही मंडळी हा पाच दिवसांचा मोठा उत्सव साजरा करतात. या काळात रोज नागोबाचे पूजन, नैवेद्य, आरती आणि रात्री नागोबाची भजने असा हा छान कार्यक्रम ही मंडळी मोठ्या भक्तिभावाने साजरा करतात. ही जी भजने म्हणून जागरण करणे ह्या प्रकाराला ठाव्याचे भजन किंवा ठावा मांडणे असे म्हटले जाते. ह्याच्या मांडणीमध्ये एक तांब्याचा हंडा, त्यावर पालथी ठेवलेली परात (कोपर) ठेवतात व लोखंडी कड्यांनी ह्यावर वाजवून नाद निर्माण करत ढोलकीच्या तालावर ही भजने म्हटली जातात. यावेळी म्हटल्या जाणाऱ्या भजनास बारी असे म्हणतात. (संगीत बारी हा प्रकार वेगळा.)

या भजनातून अनेक कथा सांगितल्या जातात. त्यात काही कथा या कृष्णलीलेच्या असतात, तर काही कथा ह्या सांब सदशिवाच्या तर काही नाग देवतेच्या. या काळात ही मंडळी अनेक कडक नियमांचे, व्रताचे अनुपालन करतात. हे नियम सामान्य मंडळींना माहीत देखील नसतात. पंचमीच्या दिवशी वारुळाची पूजा करून माती आणून त्यापासून नागदेवतेची प्रतिमा तयार करतात. रांगोळीचे घट आखून त्यावर कलश ठेवून त्या नाग देवतेचे पूजन केले जाते. नंतर ठावा करून रात्री (पहाटे) आरती केली जाते. दुसरे दिवशी सायंकाळी म्हणजेच षष्ठी तिथीला गोपाळकाल्याचे कीर्तन संपन्न होते. या नागदेवतेच्या प्रतिमेची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात येते. या मिरवणुकीत दिंड्या, भजने गात गात श्री नागराजाला मिरवत आणून नदीवर विसर्जन करण्यात येते. पुन्हा मंदिरात येऊन प्रसाद, पान-सुपारी कार्यक्रम होऊन पुन्हा ही मंडळी रात्रीच्या भजनाला उपस्थित होतात. पुढील दिवशी ठावा करून ही मंडळी पुन्हा आपापल्या कामाला लागतात.

## आता आम्ही ही परीक्षा द्यायची का?

मुंबई शहरात जर एखाद्या नवख्या परदेशी व्यक्तीस घर घ्यायचे असेल तर तो प्रथम त्या परिसरातला दलाल पकडतो त्यास ब्रोकर असे म्हणतात. मग तो त्याच्याकडील रिकाम्या घरांची माहिती व गरज असलेल्या व्यक्तींची सांगड घालून वेळप्रसंगी पदरमोड करून आलेल्या ग्राहकांचे समाधान करतो. आलेल्या ग्राहकांची गरज पूर्ण झाल्यास व त्या दोघांमध्ये व्यवहार झाल्यास या संपूर्ण व्यवहाराची मोठी अधिकृत प्रक्रिया पार पडते व ब्रोकर व्यक्तीस त्याची दलाली मिळते. व्यवहार न झाल्यास आर्थिक नुकसान होते व केलेले कष्ट वाया जातात, मात्र तरी ते ब्रोकर पुन्हा दुसऱ्या ग्राहकास सेवा देण्यास उत्साहाने तत्पर असतात. असा हा व्यवहार असून यात कोणतीही भविष्यकालीन शाश्वती नाही. कोणतेही स्थिर उत्पन्न नाही, मेहनतीची व कष्ट करण्यासाठी सदैव तत्पर असलेली ही मंडळी कुठे एका छताखाली एकत्रित नाहीत तरी प्रत्येक ठिकाणी या मंडळींची गरज ही असतेच. मात्र शासनच यांच्या आता मुळावर येते की काय अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे.

औद्योगिक कारणामुळे मुंबईतील गिरण्या व कारखाने बंद पडले. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या व कामगार बेघर झाला. आपले घर चालावे म्हणून मुंबईतील हजारो लोकांनी इस्टेट एजंटांचा मार्ग स्वीकारला. या कामात महिना दोन महिने एखादे दुकान किंवा घर दाखवण्यासाठी पायपीट करून एखाद्याचे काम होते. त्या कामाचे काही वेळेस ग्राहकांकडून कमिशनही दिले जात नाही. कारण कमिशन देण्याचा कायदाच अस्तित्वात नाही. त्यांना वाटते की एजंट चांगल्या स्थितीत आहेत. पण मुंबईतील लाखो इस्टेट एजंट आणि दोन टक्के एजंट चांगल्या सुस्थितीत आहेत; परंतु ९८ टक्के एजंट अतिशय हलाखीच्या परिस्थितीत हे काम करत आहेत. त्यांना ना शासनाची मदत मिळते, ना पोलिसांची मदत मिळते,



एखाद्याने कमिशन दिले नाही तर पोलीस एजंट लोकांचे म्हणणे ऐकून घेत नाहीत व त्यांना सापत्नतेची वागणूक देतात. शासन एजंट लोकांना मालक समजतात; परंतु सत्य परिस्थिती वेगळी आहे. ते वेठबिगाराप्रमाणे काम करत असतात. सौदा झाल्यानंतर घरमालक व घर घेणारे कमिशन देतील याची खात्री नसते. त्यामुळे हे एजंट नेहमी दुसऱ्यावर अवलंबून असतात. एजंट लोक एखाद्याचे घर दुसऱ्याला म्हणजे घर घेणाऱ्याला दाखवतात. तसेच अनेक घरं अनेक दुकानं रोज दाखवण्याचे काम पायपीट करून करत असतात, त्यावेळी जर सौदा झाला तर घर मालक व घर घेणारे कमिशन देतील याची खात्री नसते. म्हणूनच इस्टेट एजंट हे घर घेणारा व घर देणारा याच्यावर अवलंबून असतात. यात सर्व तोंडी दिलेल्या शब्दांवर प्रथम व्यवहार चालतो. कोणतेही स्थिर उत्पन्न नसल्याने त्यांना बँकेकडून कर्जही मिळत नाही. यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व मुलांचे शिक्षणही व्यवस्थित होत नाही. अशा परिस्थितीत त्यांना इतर असंघटित कामगारांप्रमाणे सर्व शासन सुविधापासून वंचित राहावे लागते. विशेष म्हणजे सध्या घडीला या क्षेत्रात ९० टक्के मराठी माणसे आहेत व १० टक्के उत्तर भारतीय आहेत. असे असूनही सरकारी अनास्था या लोकांच्या बाबतीत दिसून येते. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण खात्यांतर्गत असणाऱ्या महारेरा यांनी इस्टेट एजंटांसाठी आता परीक्षेची अट घातली आहे. ती अन्यायकारक असल्याची या सर्वांची भावना झाली आहे. जर काही परीक्षा पास झाले तरच यापुढे त्यांना अधिकृतपणे दलालीची कामे करता येणार आहेत. यामध्ये काम करणारे बरेच जण अशिक्षित व शिकलेले वयोवृद्ध अथवा आपले दुसरे काम सांभाळून या कामात वेळ देणारे आहेत. त्यामुळे महारेराने इस्टेट एजंटसाठी ही परीक्षा अनिवार्य केली आहे. ती परीक्षा बहुतांश मुंबईत राहणारे भूमिपुत्र पास होऊ शकत नाहीत. कारण ते गेल्या अनेक वर्षांपासून वेगवेगळे उद्योग, कामधंदा करून रिअल इस्टेटचे काम करत आहेत व आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवत आहेत. महारेरा यांनी जो परीक्षेचा आदेश काढला आहे तो तत्काळ रद्द करावा जेणेकरून या इस्टेट एजंट युनियनमध्ये काम करणारे लाखो लोक बेरोजगार होणार नाहीत अशी त्यांची मागणी आहे. **क्रमश:**

**- मुंबई डॉट कॉम : अल्पेश म्हात्रे**

### शब्दकोडे-१५७



आडवे शब्द -

३. अफवा ६. अहोरात्र ९. दगाबाज ११. अंधार १२. कावळा १३. रक्तवाहिनी १५. बनावट १७. कलामध्ये निपुण असलेली १८. उकळलेले २०. निर्लज्ज २१. वेगवेगळे २२. कैद, ताब्यात घेणे २४. अट, शर्त २७. दुसऱ्यावर अवलंबून असलेला २९. टिकाव ३०. जानी दोस्त ३१. शहाणा ३२. संरक्षक आवरण ३४. पृष्ठभागाचा लहानसा तुकडा ३५. ढीग, रास ३६. अवाक्षर ३७. असंमती ३९. हिरावणे, भंग करणे ४१. तऱ्हा ४३. पूर्ण भरतीची वेळ ४४. सहाय्यक ४६. विभाग ४९. व्याघ्रगर्जना ५०. जपणूक ५१. ढग, भरभर ५२. चुलता ५४. चरबी ५५. हंगाम ५६. यशस्वी ५७. हनुमान ५९. धोका (हिंदी) ६१. केकसाठी लागणारे पीठ ६२. पारंब्यांचे झाड ६३. फावला वेळ ६४. साठ मिनिटे ६७. किडा ७०. चपखल प्रत्युत्तर देणारा ७४. कौशल्य ७६. सोटा ७८. पवन ८०. प्रखर ८१. म्हशींची एक जात ८२. नेत्र ८३. रेषा, रेखा

उभे शब्द -

१. घोडेस्वार २. थोड्या वेळापूर्वी ३. शिल्लक ४. रमलेला ५. जाणे ६. क्रोध ७. सायंकाळ ८. नाहक द्वेष (ला.) १०. परांगत १२. पार्वतीचे उग्र रूप १४. घोड्याचे खाणे १६. कारस्थान १७. केसांचा कृत्रिम रंग १८. ऋण १९. कयास २१. पाण्यात बुडी मारणे २२. निरंतर, सतत २३. विडा रंगवणारा पदार्थ २४. सश्रद्ध २५. अजाण २६. एकाग्र नजर २७. फजिती २८. धैर्यवान २९अ. प्रस्थान ३०. मागणी, विनंती ३१. विड्यातला महत्त्वाचा घटक ३३. भूपाळीतला कृष्ण ३८. युवती ३९. हसऱ्या मुद्रेचा ४०. धुंदी ४२. पूर्वसूचना न देता ४३. सूर्योदयाची वेळ ४५. झोप ४७. स्वतःचे, वैयक्तिक ४८. गुणग्राहक ५२. कूर्म ५३. प्रसंग ५४. -- काळे (प्रसिद्ध लेखक) ५४अ. योग्यता ५५. मोठा चाकू ५७. पंख ५८. झुकलेला ६०. फिर्याद ६३. पैसे न मोजता ६५. बरोबर ६६. आश्रयस्थान ६८. पत्र, डाक ६९. गुरांचे कोरडे अन्न ७१. भूमी ७२. सैनिक ७३. मजा ७५. उणे ७६. ठीक, मध्यम ७७. बिछाना ७९. ढग

### शब्दकोडे १५६ चे उत्तर

**आडवे उत्तर**

२.खबरदारी ५.सवालजवाब ९.दुर्लक्षित १०.माह १२.दंड १४.रवा १६.कस्तुरीमृग १९.जादूगार २०.सनातनी २३.चकमक २४.टग्या २५.सागरतीर २९.जुने ३०.खीर ३१.तरु ३३.कृतज्ञ ३४.टवाळ ३६.अंगना ३९.मोकाट ४१.विटका ४२.सफरचंद ४५.सराईत ४८.अधिक ५०.बोट ५१.करुणा ५२.डाकू ५३.क्रोध ५४.बळकटी ५६.प्रथा ५८.अखिल ५९.दाटी ६०.संतापलेला ६२.दरा ६४.कलकत्ता ६६.खडूस ६८.आरव ६९.बट्टा ७१.जोक ७२.मलई ७५.कूपमंडूक ७७.कृश ७८.कर्नाटक ७९.रडराऊत ८३.रान ८४.परीक्षा

**उभे उत्तर**

१.दुर्लभ २.खतरनाक ३.रमा ४.दाहक ६.वादंग ७.लड ८.वावदूक ११.कैरी १३.धरणी १५.वात १७.स्तुती १८.मृदंग १९अ.पचका २०.समजूतदार २१.नीटनेटका २२.प्रीती २५.सार २६.रणांगण २७.रस्सा २८.अंत ३०.खीळ ३२.रुक्ष ३५.वाटसरु ३७.कंटक ३८.दासबोध ३९.मोद ४०.बाई ४१.विधिलिखित ४३.फट ४४.चंगळ ४६.राणा प्रताप ४७.तडा ४९.माधवराव पेशवे ५१.कटी ५४.बटीक ५५.कलंक ५७.थाप ६१.लेखक ६१अ.लाडू ६२.दर ६३.मुबलक ६५.लक्ष्य ६७.सम ६८.आई ७०.समंध ७१.जोकर ७३.लढाऊ ७४.भाट ७६.भात

## सोन्यावर कर्ज घ्यावे की, विक्री करावी?

दागिने विकून जे पैसे आले त्यातून तक्रारदाराच्या कर्जखात्यात असलेली रक्कम वळती करून घेतली आणि उरलेले पैसे ड्राफ्टद्वारे त्याला पाठवून दिले; परंतु तक्रारदारास नोटीस मिळाली नाही, या कारणास्तव जिल्हा मंचाने बँकेच्या विरोधात निकाल दिला. बँकेने तक्रारदाराला कर्ज देताना जे कागदपत्र करार केले होते, त्यातील पत्ता आणि ज्या पत्त्यावर नोटीस पाठवली तो पत्ता वेगवेगळा होता, हे न्यायालयाने लक्षात घेतले. निकालपत्रात मंचाने आदेश दिला की, सदर बँकेने जेवढे सोने गहाण म्हणून घेतले होते, तेवढे तक्रारदाराला परत करावे. शिवाय तक्रारदाराला नुकसानभरपाई म्हणून रु. २५,००० आणि कज्जेदलालीचा खर्च म्हणून रु.३,००० द्यावेत.

हा निर्णय अर्थातच बँकेला मान्य झाला नाही. त्यामुळे तिने तामिळनाडू राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे अपील केले. राज्य मंचाने जिल्हा मंचाचा आदेश कायम ठेवून बँकेचे अपील फेटाळून लावले आणि नवीन आदेश दिला की, सदर सोन्याच्या बदल्यात त्याची आजच्या बाजारभावानुसार जी किंमत होते, ती तक्रारदाराला द्यावी. अपेक्षेप्रमाणे बँक दिल्ली येथील राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे गेली आणि तिथे तिने राज्य मंचाच्या आदेशाविरोधात अपील दाखल केले. राष्ट्रीय आयोगानेही लक्षात घेतले की, बँकेने जी नोटीस तक्रारदारास पाठवली, ती चुकीच्या पत्त्यावर पाठवली होती. सबब अपील करताना बँकेकडे कोणतेही सबळ कारण नाही, असे सांगून हे अपील फेटाळून लावले गेले.

वाचकहो, तक्रारदाराने कर्ज सोन्याच्या तारणावर घेतले होते, हे लक्षात घेऊन इथे काही गोष्टी मुद्दामहून नमूद करायच्या आहेत. प्रत्यक्ष सोने, सोन्याचे दागिने यावर बँका जे कर्ज देतात ते किती असावे, हे त्या दिवशीचा सोन्याचा जो भाव असेल त्यावर ठरते. बँकांच्या अधिकृत पॅनेलवर सोन्याची परीक्षा करणारे काही दुकानदार असतात, ते सोन्याचा कस पाहतात, दागिने असतील तर प्रत्यक्ष सोने किती वापरले गेले त्याचे वजन करतात आणि त्या दिवशीचा जो भाव असेल त्याप्रमाणे किंमत ठरवतात. तसे ते बँकेला लेखी कळवतात. याची एक प्रत आपल्याजवळ ठेवावी. या किमतीच्या साधारण ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत कर्ज दिले जाते. मात्र त्यातून विविध प्रकारचे शुल्कही ग्राहकाकडून वसूल केले जाते. त्यात सोन्याची किंमत ठरवणे, कर्जाचे कागदपत्र तयार करणे, याचे शुल्क अंतर्भूत असते. सोने कर्जावर साधारणतः वार्षिक ११ ते १२ टक्के दराने व्याज आकारले जाते. कर्जावर दर महिन्याला व्याज लागते आणि ते साधारणपणे सात दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे. **समाप्तः**

**- अभय दातारः मुंबई ग्राहक पंचायत**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय -** फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय -** शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय -** बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# कलाग्रामच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादन विक्रीसाठी हक्काचे स्टॉल्स उपलब्ध करून देणार : भुजबळ

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिकच्या गंगापूर गाव परिसरात साकारत असलेल्या कलाग्रामच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादनास विक्रीसाठी हक्काचे स्टॉल्स उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. आज पंचायत समिती नाशिकच्या आवारात आयोजित उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत रानभाज्या महोत्सव व राखी महोत्सवास दिलेल्या भेटीप्रसंगी मंत्री छगन भुजबळ बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, पंचायत समिती गट विकास अधिकारी सोनिया नाकाडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले, कलाग्रामसाठी सुमारे ८ कोटी रूपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असून या कालाग्राम मध्ये कायमस्वरूपी १०० स्टॉल्स उभारले जाणार आहेत. येत्या दोन ते तीन महिन्यात कलाग्रामचे काम पूर्ण केले जाणार असून ते स्वयंसाह्य बचतगट, महिला बचतगट , आदिवासी महिला उद्योजक यांच्यासाठी माफक दरात खुले केले जाणार आहे. तसेच येवल्याच्या पैठणी केंद्रात देखील हक्काची जागा उपलब्ध करून देण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, रानभाजी महोत्सवातून जनसामान्यांना रानभाज्यांची आवड निर्माण करण्याचा चांगला प्रयत्न उमेदच्या माध्यमातून होत आहे. येथील प्रदर्शनात तृणधान्यांपासून बनविलेले विविध खाद्य पदार्थ, सेंद्रीय खतातून पिकविलेल्या भाज्या, रानभाज्या, पानवेलींपासून बनविलेल्या बहुपयोगी कलाकुसरीच्या वस्तू, वेगवेगळ्या डिझाईनच्या राख्या ठेवण्यात आल्या आहेत. या वस्तू अस्सल व कमी खर्चात बनविलेल्या आहेत. तसेच त्रेव्हर रिंश्रश्रशू ज्ञरीं या पोर्टलच्या माध्यमातून या वस्तूंना ऑनलाईन मार्केट उपलब्ध होत आहे ही कौतुकास्पद बाब असल्याचे मंत्री श्री. भुजबळ यांनी सांगितले. निसर्गाच्या सानिध्यात पिकलेल्या रानभाज्यांचे औषधी गुणधर्म आणि त्यांचा आहारातील समावेश आरोग्याच्या दृष्टीने हितवाह आहे. त्यामुळे नागरिकांनी या महोत्सवास भेट देवून आरोग्यवर्धक रानभाज्या व वस्तू खरेदी कराव्यात त्यासोबतच रानभाज्या बनविण्याची पाककृती सुद्धा जाणून घ्यावी असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी केले. रानभाजी महोत्सवातील स्टॉल्सला मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी भेट दिली. या महोत्सवात सुरू करण्यात आलेले ढ-ढत- (तत्व) ब्रँण्ड, इपवळपस डीेळशी ब्रॅण्ड आणि त्रेव्हर रिंश्रश्रशू ज्ञरीं या पोर्टल यांच्या माहितीचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. सीआयएफ फंडातून उन्नती बचतगट, त्र्यंबकेश्वर व सावित्रीबाई फुले बचतगट, पेठ यांना मायक्रोवेव्ह ओव्हन मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी सिताराम पावरा यांची नियुक्ती

**नंदुरबार । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी सिताराम नुरला पावरा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या आदेशान्वये व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी सिताराम नुरला पावरा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजीत मोरे व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव ड. राऊ मोरे यांच्या शिफारसीनुसार सिताराम नुरला पावरा यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या हस्ते सिताराम पावरा यांना युवक जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरत चव्हाण आदी उपस्थित होते. यापूर्वीही सिताराम पावरा हे राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष असतांना त्यांनी पक्ष संघटन व मजबूत करण्याचे कार्य केले. तसेच पावरा हे खडकी ग्रामपंचायतीचे सरपंच आहेत. युवक जिल्हाध्यक्ष नियुक्तीबद्दल सिताराम नूरला पावरा यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या हस्ते सिताराम पावरा यांना युवक जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरत चव्हाण आदी उपस्थित होते.

## कर्मयोगीनगर'चा फलक पुन्हा लावा, अन्यथा जनआंदोलन

### शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**

पूर्वीची स्थिती :-



सद्य स्थिती :-



राज्यातील सत्ताधारी गटाचा पदाधिकारी असलेल्या एका माजी नगरसेवकाच्या दबावाखाली 'कर्मयोगीनगर' नावाचा काढलेला फलक पुन्हा त्वरित लावावा, अन्यथा जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, सत्कार्य फाउंडेशनने दिला आहे. महापालिका प्रशासक डॉ. अशोक करंजकर, शहर अभियंता नितीन वंजारी यांना याबाबतचे निवेदन काल सोमवारी, २१ रोजी देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग २४ मधील गोविंदनगर रस्त्यावर कर्मयोगीनगर येथे महापालिकेच्या मान्यतेने आरडी ग्रुपच्या सीएसआर फंड आणि संकल्पनेतून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, सत्कार्य फाउंडेशनसह रहिवाशांचे आंदोलन व पाठपुराव्याने जॉगिंग ट्रॅक व सेल्फी पॉईंट साकारण्यात आला. त्याबद्दल निवेदनातून जाहीर आभार मानण्यात आले आहेत. ज्यांनी या कामासाठी बोटभर चिठ्ठीची तसदी घेतली नाही, त्या राज्यातील सत्ताधारी पक्षाचा पदाधिकारी असलेल्या माजी नगरसेवकाने संकल्पना व कामाचे श्रेयही लाटले. सत्तेच्या मस्तीत १४ ऑगस्ट रोजी एकतर्फी लोकार्पण घडवून आणून स्वत:ची पाठ स्वत:च थोपटून घेतली. हे प्रावीण्य दाखवताना त्यांचा इतका तोल गेला की, प्रशासनावर दबाव टाकून त्यांनी या सर्कलवरील 'कर्मयोगीनगर' नावाचा फलकच गॅस कटरने हटवून घेतला. हा फक्त फलकच नाही, तर या परिसराची ही ओळख आहे ती पुसण्याची, नाशिककरांच्या भावना चिरडण्याची ही कृती प्रशासनाने या माजी नगरसेवकाच्या दबावाखाली केली आहे. असा आरोप दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. काल रोजी या घटनेला आठ दिवस झाले आहेत. या ठिकाणी पुन्हा हा फलक लावण्यात आलेला नाही. कर्मयोगीनगरची कायमची ओळख पुसण्याचा कुटील डाव जनता सहन करणार नाही. 'कर्मयोगीनगर' नावाचा फलक पुन्हा दर्शनी भागात त्वरित लावावा, अन्यथा जनता रस्त्यावर उतरली, जनभावनांचा उद्रेक झाला, तर त्यास सत्ताधार्यांच्या दबावाखाली जनविरोधी काम करणारे प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा या निवेदनाद्वारे सत्कार्य फाऊंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगीता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, डॉ. शशिकांत मोरे, शैलेश महाजन आदींसह ज्येष्ठ नागरिक संघ व परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

## एटीएम कार्डची अदलाबदल करत डॉक्टरला ४० हजाराला गंडा

**नाशिक** । येथील शहर व परिसरात एटीएम कार्डची अदलाबदल करून परस्पर खात्यातून रक्कम काढून घेण्याच्या तीन दिवसांत चार घटना घडल्या आहेत. नाशिकरोड मुक्तिधाम भागात एका महिला डॉक्टरांनाच अशा पद्धतीने बोलण्याच्या ओघात एटीएम कार्डद्वारे त्यांची ४० हजारांची रोकड काढून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी उपनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुक्तिधाम येथील एसबीआय बँकेच्या एटीएम केंद्रात दुपारच्या सुमारास डॉ. वंशिका राजेंद्र चव्हाण (रा. आनंदनगर, नाशिकरोड) या पैसे काढण्यासाठी थांबल्या होत्या. त्याचवेळी आधी पैसे काढून बाहेर पडत असल्याचे भासवत एटीएम केंद्रात कार्ड अडकत असल्याचे सांगून डॉ. चव्हाण यांच्याशी बोलून संशयिताने थांबा मी कार्ड टाकून देतो, असे म्हणत त्यांना काही समजण्यापूर्वीच भामट्याने ४० हजारांची रोकड काढत पलायन केले.

## मोदी आवास योजनेचा पात्र नागरिकांना लाभ मिळवून द्या



### मंत्री छगन भुजबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील इतर मागास प्रवर्गातील नागरिकांसाठी 'मोदी आवास' योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये सन २०२३ -२४ मध्ये नाशिक जिल्ह्यात सुमारे ३५ हजार घरकुल निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. तसेच इतर मागास प्रवर्गातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा अशा सूचना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना दिल्या.

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील इतर मागास प्रवर्गातील नागरिकांसाठी राज्यात 'मोदी आवास' योजना राबविण्यात येत आहे. योजनेसाठी १२ हजार कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. प्रतिवर्ष ३ लाख घरे बांधण्यात येणार आहे. आज नाशिक येथील कार्यालयात राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी अधिकाऱ्यांसमवेत या योजनेचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील याद्यांची पडताळणी करून याद्या त्वरीत अद्ययावत कराव्यात. या योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करून पात्र नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यात यावा अशा सूचना सबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

प्रोसेस जमा अ‍ॅड. श्रीमती. ए. ए. गावीत
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री यांचे न्यायालयात**

**फौ. कि. अर्ज. क. २४८ / २०२३**

माण्या जाण्या मावळी (भिल), उ.व. ४७, धंदा- शेती,
रा. कडुपाडा, पो. उमरपाटा, ता. साक्री, जि. धुळे **....अर्जदार**

**विरुध्द**

म. ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
नांदर्खी, ता.साक्री, जि.धुळे **... जाबदेणार**

जानीबाई जाण्या मावळी (भिल), मृत्यू दिनांक-१९/११/२०१८
मृत्यु स्थळ- मौजे कडुपाडा, ता.साक्री, जि.धुळे

ज्या अर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात दिनांक १६/०५/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज क. २४८ / २०२३ दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म / मृत्यू अधि. १९६९ चे कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म / मृत्यू नोंदणी नियम २००० मधील क. ९ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करणेबाबत साक्री न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता दिनांक ०८/०९/२०२३ ही तारीख निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तकार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- २१/०८/२०२३ आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन, फौजदारी न्यायालय,साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, साक्री**

प्रोसेस जमा अ‍ॅड.श्रीमती. वनिता ए.खैरनार
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मा. २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क. १२३/२०२३**

श्रीमती मंगलाबाई भास्करराव बेडसे, उ. व. ७२, धंदा-घरकाम,
रा.चिंचखेडा, ता. साक्री, जि. धुळे वैगरे **....अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट (VIII) १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी वरील न्यायालयात दिनांक २१/०४/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की, नानासाहेब भास्करराव बेडसे यांचे दिनांक १३/१०/२०२० रोजी निधन झाले आहे. मयतांचे मृत्यूसमयी त्यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत-

१. मंगलाबाई भास्करराव बेडसे - आई
२. श्रीमती प्रतिभा नानासाहेब बेडसे - पत्नी
३. विवेक नानासाहेब बेडसे-मुलगा
४. चेतन नानासाहेब बेडसे - मुलगा

सर्व रा. चिंचखेडा, ता.साक्री, जि.धुळे

मयतास वरील प्रमाणे वारस असुन त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. मयत नानासाहेब भास्करराव बेडसे यांचे कायदेशीर वारस असलेबाबत घोषित होवुन मिळणेकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी मा. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर साक्री यांचे न्यायालयात दिनांक ०४/०९/२०२३ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- २१/०८/२०२३ आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय,साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, साक्री**

प्रोसेस जमा अ‍ॅड.एम. आर. भामरे, साक्री
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २५४/२०२३**

श्रीमती. निर्मला दत्तात्रय पाटील (बोरसे) व इतर,
उ. व . - ७२, धंदा-घरकाम,
राहणार कावठे, ता. साक्री, जि. धुळे **....अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही ... सामनेवाला**

मयत कै.दत्तात्रय नामदेव पाटील (बोरसे)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ०९/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. दत्तात्रय नामदेव पाटील (बोरसे) याचे कायदेशिर वारस मृत्यूसमयी खालील प्रमाणे आहेत.

१. श्रीमती. निर्मला दत्तात्रय पाटील (बोरसे)
२. सौ. शिला संजय सोनवणे,
३. श्री. मनोज दत्तात्रय बोरसे ( पाटील )

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे तमाम जनतेस, हितसंबंधीत वारस वगैर संबंधितांना मयत कै. दत्तात्रय नामदेव पाटील (बोरसे) यांचेशी कोणाचाही काहीही हितसंबंध, किंवा मयताचा वारस असलेबाबत काही वाद असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात दिनांक २५/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. त्याप्रमाणे, मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपास्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ- साक्री,
दिनांक २१/०८/२०२३ आदेशावरुन,

**क. लिपीक कामगिरी कारकुन, साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

## कांद्यावरील निर्यात कर रद्द करा अन्यथा आंदोलन छेडणार

### कांद्याच्या माळा घालून दिले स्वराज्यने नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**



स्वराज्य पक्ष प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार स्वराज्यचे संपर्कप्रमुख करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली कांद्यावरील निर्यात बंदी उठवावी यासाठीचे निवेदन कांद्याच्या माळा घालून केंद्र व राज्य सरकारचा निषेध करत नाशिक जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान यासंदर्भात निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल असाही इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर तब्बल ४० टक्के निर्यात कर लावण्याचा अत्यंत दुर्दैवी निर्णय घेतला आहे. वास्तविक कांदा आणि अन्य शेती उत्पादनाच्या बाजारभावाच्या मुद्यावर शेतकऱ्याला व्यवस्थेकडून सातत्याने सापत्न भावाची वागणूक मिळत असल्याने शेतीचे अर्थशास्त्र परकोटीचे विसंगत बनले आहे. खर्च आणि उत्पन्नचा ताळेबंद कधीच लागत नाही. एकूणच लहरी निसर्ग, सरकारी धोरण, नफखोर दलाल, शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलदारांच्या हाती असलेल्या औद्योगिक उत्पादनांच्या वाढत्या किंमती शेतीला तोट्यात नेत आहेत. असे असतांना कर्जबाजारी झालेला शेतकरी हतबल होऊन आत्महत्या करीत आहे. अशा परिस्थितीत दिलासा देणे तर सोडाच पण अपवादात्मक परिस्थितीत चुकून एखाद्या पिकाला थोडा अधिक भाव मिळालाच तर एखादा निर्णय घेऊन शेतकऱ्याच्या खिशात जाणारा अधिकचा पैसा सरकार रोखण्याचा प्रयत्न करत आहे. असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. कांदा निर्यातीवर लादलेले ४० टक्के शुल्क हा त्यातलाच तुघलकी निर्णय आहे. एका बाजूला गारपीट, बेमोसमी पाऊस यामुळे कांदा उत्पादकांचे झालेले प्रचंड नुकसान थोड्या प्रमाणात भरून म्हणून जाहीर झालेले अनुदान देखील हजारो शेतकऱ्यांच्या पदरात पडलेले नाही.

यंदा कांद्याला चांगला भाव मिळेल अशी शक्यता वाटत असताना निर्यातीवर बंधने आणण्याच्या हेतूने अन्यायकारक व कांदा उत्पादक शेतकऱ्यांशी केलेला द्रोहच आहे. सरकार काही देऊ शकत नसेल तर निदान बाजार व्यवस्थेतून जे काही त्यांच्या पदरात पडू शकले असते तेही या ४० टक्के निर्यात शुल्कामुळे मिळणार नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही एक प्रकारची अघोषित निर्यातबंदीच आहे.

तातडीने निर्यात कर रद्द करावा अन्यथा स्वराज्य पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी निवेदन देण्यासाठी स्वराज्य संपर्कप्रमुख करण गायकर, केशव गोसावी, विजय वाहुळे, नवनाथ शिंदे, ज्ञानेश्वर थोरात, शेतकरी आघाडी जिल्हाप्रमुख विजय खर्जल, जिल्हाप्रमुख आशिष हिरे, प्रा.उमेश शिंदे, नितीन दातीर, ड. नवनाथ कांडेकर, मनोरमा पाटील, पुष्पा जगताप, गिरीश आहेर, वैभव दळवी, शुभम देशमुख, दिनेश नरवडे, शशी राजपूत, सोमनाथ पवार, मयूर पांगरकर, रोहन सपकाळ, प्रवीण गोसावी, प्रदीप शिंदे, रेखा पाटील, रेखा जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात कानुमातेला जल्लोषात निरोप

**न्यूज कॉलम**

### नवलनगर येथून मुलीचे अपहरण

धुळे । नवलनगर येथील शाळेच्या बाहेरून अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले. याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी धुळे तालुका पोलिसांत तक्रार दिली. फिर्यादीनुसार त्यांची अल्पवयीन मुलगी १७ ऑगस्टला सकाळी नेहमीप्रमाणे शाळेत गेली. मात्र शाळा सुटल्यानंतर ती परतली नाही. त्यामुळे तिचा सर्वत्र शोध घेण्यात आला. सकाळी आठ ते दुपारी बारादरम्यान शाळेबाहेरून कुणीतरी फूस लावून तिला पळवून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

.................................

### कब्रस्तानजवळून मोटारसायकली लंपास

धुळे । धुळे शहरातील चाळीसगाव रस्त्यावरील सोना कब्रस्तान जवळील रस्त्यावरून चोराने दोन मोटारसायकली लंपास केल्या. याप्रकरणी इस्माईल मंगा पिंजारी (रा. गजानन कॉलनी, धुळे) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार १७ ऑगस्टला दुपारी पाच ते सहादरम्यान (एमएच-१८/ एएल-७०२२) व (एमएच-१९/ बीपी ०८६८) या अनुक्रमे इस्माईल पिंजारी व एजाज अहमद निसार अहमद अन्सारी यांच्या मालकीच्या प्रत्येकी २५ हजारांच्या मोटारसायकली चोरीस गेल्या. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला.

**धुळे । प्रतिनिधी**

**खान्देशाचे कुलदैवत असलेल्या कानुमातेला काल ढोलताशांच्या गजरात व गुलालाची उधळण करत जल्लोषात निरोप देण्यात आला. सर्वच सण उत्सवांवर परिणाम झाला होता. श्रावण महिन्यातील पहिल्या व दुसर्या रविवारी व सोमवारी खान्देशात कानुमातेचा उत्सव साजरा करण्यात येतो. रविवारी कानुमातेची उत्साहात स्थापना करण्यात येते. काही ठिकाणी कानुमातेसह रोट केले जातात. रविवारी विधीवत पूजा करुन स्थापना केल्यानंतर रात्रभर कानुमातेचे जागरण केले जाते. ज्या घरी कानुमातेची स्थापना केली जाते. त्या कुटूंबातील सर्व सदस्यांसह गोत्रातील सर्व नातलग सहभागी होत असतात. रात्रभर नाच गाणे, गरबे, खेळ खेळत जागरण केले जाते. सोमवारी सकाळी या कानुमातेला निरोप देण्यात येतो. या कानुमातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात येते. या मिरवणुकीत डीजे, ढोलताशांचा गजर करत गुलालाची उधळण करण्यात आली. या मिरवणूकी हजारो भाविक सहभागी झाले होते. यावेळी नदीपर्यंत काढण्यत आलेल्य मिरवणुकीत मोठया प्रमाणावर जल्लोष करण्यात आला. यावेळी भाविक महिलांनी जिम्मा फुगडीचा आनंद लुटला.**





### पढावद येथे मिरवणुकीने कानबाईचे विसर्जन

**धुळे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तालुक्यातील पढावद येथे कानबाई मातेची मोठ्या उत्साहात घरोघरी स्थापना करण्यात आली होती. सोमवारी, पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढून या उत्सवाची सांगता करण्यात आली. त्या घरातील अबाल वृद्ध तल्लीन होवुन पारंपारीक ठेका धरतांना दिसुन आले. फुगड्यांसह महिलांनी नृत्यावर ठेका धरलेला दिसून आला. खानदेशवासीयांचा महत्त्वपूर्ण सण कानबाईच्या उत्सवासाठी सर्वच कुटुंबीय एकत्र येत असतात.

बन्सीलाल अमृत पवार,नंदाला अमृत पवार, प्रेमलाल अमृत पवार, कांतीलाल अमृत पवार, अनिल बळीराम पवार, सुनील बदिराम पवार, सतीश बदिराम पवार आदी उपस्थित होते.

## सोनगीर परिसरात पारंपारिक पद्धतीने कानबाईला निरोप

**सोनगीर । प्रतिनिधी**

परिसरात सालाबादा प्रमाणे ह्या वर्षी देखील पारंपारिक पद्धती नुसार कानबाई मातेची स्थापना करण्यात आली होती. कानबाई मातेचे दि.२१ ऑगस्ट सोमवार रोजी ढोल-ताशाच्या गजरात कानबाई मातेचे उत्साहात विसर्जन करण्यात आले.

खान्देशातील ग्रामदैवत मानल्या जाणाऱ्या कानबाई माता उत्सव ह्या वर्षी देखील मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला.या उत्सवासाठी मोठ्या संख्येत इतर गावांना असलेली भाऊबंदकी व परीसरातील भाविक मोठ्या संख्येत हजेरी लावतात. सालाबाधाप्रमाणे ह्या वर्षी देखील सोनगीर परिसरात माळी,पाटील, न्हावी,गुजर,सोनार,कासार,धनगर,चौधरी,बडगुजर,लोहार आशा विविध समाज बांधवांनी विविध ठिकाणी मोठ्या संख्येत कानबाई मातेची स्थापना करण्यात आली. रविवार सकाळी स्थापन करण्यात आलेल्या कानबाई मातेचे भक्तिमय वातावरणात काल विसर्जन करण्यात आले.रविवारी स्थापन झालेल्या कानबाई मातेचा दर्शनासाठी गावातील महिला नागरिकानी गर्दी केली होती.



गावात स्थापन झालेल्या कानबाई माताचे महिला व पुरुष मंडळींनी घरोघरी जाऊन भावपूर्णश्रद्धेने दर्शन घेऊन ह्या वर्षी चांगला पाऊस पाडुदे दुष्काळ दूर मिटू दे शेतकरी राजाला चांगले दिवस येऊ दे अशी प्रार्थना कानबाई चा चरणी केली.रात्रभर खानदेशी गाण्यांच्या तालावर तसेच डी.जे वर कानबाई मातेच्या जय जयकार करत रात्रभर जागरण करून सोमवारी सकाळी ९ वाजेपासून कानबाई मातेची विसर्जन मिरवणूक गावातील गांधी चौक,बागुल गल्ली,वीर भगतसिंग चौक, गुजर गल्ली, मारीआई चौक, अशा विविध मार्गांनी वाजत गाजत मातेच्या जय जयकार करत खान्देशी कानबाई गाण्यांवर परिवारासह नाचत-कुदत भक्तिमय वातावरणा मिरवणून काढण्यात आली.यानंतर गावालगतच असलेल्या प्राचीन सोमेश्वर महादेव मंदिर परिसरात गावातील स्थापन झालेल्या सर्व कानबाई माता एकत्र जमुन सर्वांनी आपल्या परिवारासह मातीच्या भक्तिमय वातावरणात आरती करून विसर्जन करण्यात आले.यावेळी उत्सवासाठी संपूर्ण समाज बांधव व मित्र मंडळी आपल्या परिवारासह या उत्सवात उपस्थित होते.

## ८० फुटी रोड ते नंदी रोड रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा आ.फारुख शाह यांच्या हस्ते शुभारंभ




**धुळे । प्रतिनिधी**

धुळे शहरातील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत ८० फुटी रोड ते नंदी रोड पर्यंतच्या कामाचे ५० लाख रुपये कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आआला. यावेळी आ.फारुख शाह यांनी आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की शहरातील मूलभूत सुविधा व विकास करण्याचे ध्येय आम्ही घेतले असून शहरातील रस्ते गटारी व पाणीचे पाईपलाईन शहराच्या विविध भागात करण्यास आम्ही बांधील आहोत. तसेच शहरातील बेरोजगारी दूर करण्यासाठी एमआयडीसी भागात जमीन अधिग्रहण करण्यासाठी शासनाकडे प्रयत्न केले जात आहे. आजपर्यंत शहराच्या विकासासाठी कोणत्या आमदारांनी जितका निधी मूलभूत सुविधांसाठी आणला नसेल तितका निधी त्यापेक्षा शेकडो कोटीचा निधी शहराचा विकासासाठी आम्ही आणला आहे. शहराच्या विकासाच्या खोट्या वल्गना करण्यापेक्षा प्रत्यक्ष शासनाकडून निधी आणण्याचे काम आम्ही केले आहे. शहराच्या नागरिकांच्या कामासाठी निवेदन आल्याबरोबर प्रत्यक्ष त्या कामाबाबत पाठपुरावा करून काम करून देणे हेच माझे मी कर्तव्य समजतो असे प्रतिपादन आ.फारुख शाह यांनी धुळे शहरातील ८० कोटी रोड पासून ते नंदी रोड पर्यंतच्या ५० लाख रुपये कामाच्या कामाच्या शुभारंभ करतेवेळी केले.

यावेळी या भागातील नागरिकांनी आ.फारुख शाह यांचा सत्कार केला व आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की सुमारे पन्नास वर्षापासून असलेल्या या वस्तीला आजपर्यंत रोड नव्हता. परंतु आ.फारुख शाह यांच्याकडे निवेदन दिल्याबरोबर आ.फारुख शाह यांनी आमचे काम सहा महिन्यात करून दिले. याबद्दल तिथल्या नागरिकांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला या भागातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. आ.फारुख शाह यांचेसोबत नगरसेवक युसुफ मुल्ला, नगरसेवक मुक्तार अन्सारी, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक आमिर पठाण, गुफरान पोपटवाल, असलम अन्सारी, जाकिर अन्सारी, प्यारेलाल पिंजारी, निजाम सैय्यद, मौलवी शकील, सुलेमान मलिक, सुफी हाजी, जमील खाटीक, आसिफ शाह, जावेद मिर्झा, सउद सरदार, हलीम शमसुद्दिन, माजीद पठाण, जैद अन्सारी, जिड्ड्या पहिलवान, सिराज मलिक, छोटू खाटीक, अकबर शेख, युसुफ शेख, वसिम शाह, अरुण भागवत, नाजिम शेख, हाशिम अन्सारी, वाजिद मिर्झा, मोहम्मद असलम मलिक, अजीज अन्सारी, जावेद शाह आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर

**नाशिक । प्रतिनिधी**

शिंदखेडा महाराष्ट्र शासनाच्या विविध लोकोपयोगी योजना, संगटना बांधणी या विषयावर महाराष्ट्र नाभिक महामंडळ नाशिक जिल्हा व नाशिक जिल्हा नाभिक युवा सेनेचे जिल्हा प्रमुख रोशन शिंदे यांनी आयोजित केलेले मार्गदर्शन शिबीर सिडको येथील संतसेना मंदिर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या शिबिरात प्रमुख मार्गदर्शक दिशा फाउंडेशनचे समन्वयक रवी सानप तसेच महिला बचतगटाच्या तुळजाभवानी फाउंडेशनच्या सरला चव्हाण यांनी शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहितीसह समाजातील महिला, तरुण, जेष्ठ नागरिक व सलून व्यवसायिक यांना त्याचा कसा उपयोग होईल यावर सम्पूर्ण विवेचन केले. तसेच संघटना बांधणीसाठी समाज प्रबोधन या विषयावर समीर देव यांचे व्याख्यान झाले.

शिबिराचे उदघाटन

महाराष्ट्र बारा बुलेदार महासंघाचे प्रदेश अध्यक्ष कल्याणराव दळे यांनी केले. याप्रसंगी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे सेक्रेटरी दिलिप अनार्थे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक सुर्यवंशी, नारायणराव यादव, दिलिपराव जाधव, अरविंदराव देसाई, संजय गायकवाड, जिल्हा युवा सेनेचे अध्यक्ष रोशन शिंदे, ज्ञानेश्वर कडवे, अरुण सैदाणे, तुषार बिडवे, जगदीश सोनवणे, सुरेश सूर्यवंशी, अनिल वाघ, नितीन वाघ, रमेश आहेर, राजेंद्र कोरडे, डॉ.प्रकाश वाघ, श्रीकांत वाघ, बाळासाहेब बिडवे, सचिन सोनवणे, ज्ञानेश्वर बोराडे, अशोक इशे, दत्ताजी वाघ, अरुण कडवे, प्रमोद सोनवणे, सोमनाथ शिंदे, नाना सैंदाणे, वैशाली सैंदाणे, पल्लवी मगर, सविता सस्कर, संगिता बोरसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात कल्याणराव दळे, अशोक सूर्यवंशी, रोशन शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संतोष वाघ यांनी तर आभार प्रदर्शन अशोक इशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पप्पू पगारे, गौरव पगारे, अजय निकम, अविनाश शिंदे, सोनू जाधव, चेतन व्यवहारे, सुनील गायकवाड, प्रेम भदाणे, निलेश ठाकरे यांनी प्रयत्न केले. यावेळी संतोष गायकवाड, जीवन शिंदे,राकेश शिंदे,मंगेश कोरडे, विशाल चित्ते यासह संघटनेचे सर्व महत्त्वाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्व तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिराणी साहित्य परिषदेतर्फे विविध पुरस्कारांचे वितरण



**धुळे । प्रतिनिधी**

अहिरानी साहित्य परिषदेच्या धुळे वतीने धुळ्याच्या श्री छत्रपती शाहू महाराज नाट्यमंदिर पारोळा रोड धुळे येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेत अहिरानी साहित्य परिषद धुळे मार्फत पुरस्कार प्रदान करण्यात आला. प.पू ब.ना.कुंभार गुरूजी स्मरणार्थ साहित्य पुरस्कार प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांच्या आगारी या कथा संग्रहास प्रदान करण्यात आला. कै.ॲड.नानासो झु.भि. पाटील स्मरणार्थ साहित्य पुरस्कार हा जळगाव येथील साप्ताहिक बडगुजर उवाच चे संपादक द.शं.बडगुजरयांच्या झिपरी या कादंबरीस दिला. श्रीमती सिताबाई शंकर माळी स्मरणार्थ अहिरानी साहित्य पुरस्कार हा जालना येथील शिक्षिका काशीकन्या वनमाला पाटील यांच्या अहिरानी खजिना,



अहिरानी अनुवाद हरिपाठ गीता जशी हे तशी या पुस्तकाना देण्यात आला. पुरस्कारार्थीना प्रत्येकी एकवीस शे रुपये रोख स्मृतिचिन्हे,मानवस्त्र, स्वभाव हा ग्रंथ गुलाब पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या समारंभात प्रा.आ.शरद पाटील,प्रा.डॉ.फुला बागुल, अखिल भारतीय नाट्य परिषद निमायक मंडळ मुंबई, दै.लक्ष महाराष्ट्र संपादक चंद्रशेखर पाटील, प्रा.डॉ.बापूराव देसाई , अमळनेर येथील प्रा.संदिप घोरपडे, बन्सीलाल भागवत यांचा ही मानवस्त्र , स्वभाव ग्रंथ गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. या सभेत संदिप घोरपडे यांनी सांगितले की अमळनेर येथे आयोजित अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आपणांस आमंत्रण देत आहे. हे साहित्यसंमेलन ऐतिहासिक व्हावे ,शासन पुरेसा निधी देत नाही.हेसंमेलन आगळ वेगळं व्हावं यासाठी प्रयत्न केले जात आहेत. बन्सीलाल भागवत यांनी सांगितले की प.पू.सानेगुरुजींच्या कर्मभूमीत हे साहित्य संमेलन होत आहे. विविध भाषा बोलल्या जातात. प्रत्येकाला संधी दिली पाहिजे. अशी कामाची विभागणी करण्यात येणार आहे. आ.शरदराव पाटील यांनी सांगितले की अहिरानी साहित्य परिषद ही व्यासंगी असून विविध प्रकारच्या अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. पुढे होणाऱ्या अहिरानी साहित्य संमेलन धुळे येथील महाविद्यालयात होईल असे सांगितले. प्राचार्य डॉ संजीव गिरासे यांनी सांगितले की आगारी ग्रंथात काय बदल झाला आहे यात निवेदक म्हणून ओळखली जाते. द.शं.बडगुजर यांनी झिपरी ची ओळख करून दिली. वनमाला पाटील यांनी सांगितले की अहिरानी भाषा टिकेल. चांगल्या पद्धतीने सर्वे क्षण केले आहे. अनुवाद करण्यास चांगली संधी आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रभाकर शेळके यांनी केले.तर भगवान पाटील यांनी ओळख करून दिली.

## 'स्कूल स्टुडंट कौन्सिलच्या' विद्यार्थी प्रतिनिधींचा 'शपथ विधी सोहळा' उत्साहात

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दाउळ शिवार कँपस् दोंडाईचा येथे दि. १९ रोजी शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने ' स्कूल स्टुडंट कौन्सिल ' प्रतिनिधींचा ' शपथ विधी सोहळा ' उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पी. आय. श्रीराम पवार - दोंडाईचा पोलिस स्टेशन व शिवनंदन राजपूत - बांधकाम निरीक्षक न. पा. दोंडाईचा तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम, उप प्राचार्या रजिया दाउदी हे मान्यवर उपस्थित होते.

सदरच्या शपथ विधी सोहळ्याची सुरूवात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकानंतर पी. आय. श्रीराम पवार यांनी ' स्कूल स्टुडंट कौन्सिल ' विद्यार्थी प्रतिनिधींना आपले पद व जबाबदारी आणि कर्तव्य यांची जाणीव करून देणारी शपथ दिली. यात हस्ती




स्कूल हेड बॉय व हेड गर्ल तसेच डेप्युटी हेड बॉय व डेप्युटी हेड गर्ल ; सोबतच विद्यार्थ्यांचे ग्रीन हाउस, रेड हाउस, यलो हाउस व ब्ल्यु हाउस; अशा चारही हाउसेसचे एकुण १६ - मुले प्रिफेक्ट व व्हा. प्रिफेक्ट आणि - मुली प्रिफेक्ट व व्हा. प्रिफेक्ट यांना शपथ दिली. तसेच हस्ती स्कूलच्या इ. ३ री ते इ. १२ वी च्या १० वर्गांच्या एकुण २८ तुकड्यांचे बॉय क्लास मॉनिटर व गर्ल क्लास मॉनिटर, सोबतच डिसीप्लिन मॉनिटर, स्पोर्टस् मॉनिटर, क्लिन्लिनेस मॉनिटर, ईलेक्ट्रिसिटी अँड वॉटर मॉनिटर; प्रत्येक तुकडीतून १० प्रतिनिधी असे एकुण २८० विद्यार्थी प्रतिनिधींना आपल्या पदाच्या जबाबदारीची व कर्तव्याची शपथ दिली. विद्यार्थी प्रतिनिधींच्या शपथ विधी सोहळ्यानंतर मा. पी. आय. श्रीराम पवार साहेब यांनी विद्यार्थ्यांना आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, विद्यार्थी प्रतिनिधींना शपथ देतांना मला राज्यपाल राष्ट्रपती असल्या सारखे वाटले. जणूकाही मी आमदार खासदारांना शपथ देतोय. अशा भावना व्यक्त केल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात नियमित अभ्यासासोबत स्पर्धा परीक्षा, स्पोर्टस्, एन. सी. सी. तसेच इतर एक्टिव्हिटीही खूपच महत्वपूर्ण असतात. याद्वारा व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधला जातो. हस्ती स्कूलने विद्यार्थी प्रतिनिधींसाठीची लोकशाही पद्धतीने ई निवडणूक मतदान प्रक्रिया; व स्कूल हेड बॉय व हेड गर्ल पदांसाठीची अभ्यासातील गुणवत्ता व मुलाखत द्वारा नियुक्ती करण्याची पद्धती, याबाबींचे कौतुक केले. सोबतच विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करावे. शाळा, कुटुंब व समाजासाठी ' छोटा पोलिस व्हावे. असेही प्रतिपादन केले. स्कूल स्टुडंट कौन्सिल शपथ विधी सोहळ्याचे सुत्रसंचालन शिक्षक विजय खांडेकर, विजेंद्र भोई, नरेंद्र पाटिल यांनी केले. सोहळा यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

**पाहिजेत**

**कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे** Tally,Execl, Word **चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.**

: संपर्क :

**ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे**
पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.
**मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत**

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

मंगळवार, दि. २२ ऑगस्ट २०२३





# धुळे शहरात मध्यरात्री दरोड्याचा थरार



















धुळे ।
शहरातील एका घरावर सशस्त्र दरोडा टाकण्यात आला. दरोडेखोरांनी सोन्याच्या दागिन्यांसह लाखो रुपये रोख हिसकावून नेले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार धुळे शहरातील पारोळा रस्त्यावरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पाठीमागे पंजाबी टिंबर मार्ट आहे. या ठिकाणी विनोद भसिन आणि त्यांचा मुलगा विशाल भसिन यांचे निवासस्थान आहे. या निवासस्थानाच्या बाजूला असलेल्या पाण्याच्या टाकीवरुन दरोडेखोरांनी भसिन यांच्या घरात जाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना घरात शिरता आले नाही. यामुळे त्यांनी घराचा दरवाजा तोडला. पहाटे अडीच वाजता ही घटना घडली. पाचही दरोडेखोर भसिन यांच्या घरात शिरले. विनोद यांच्या डोक्याला बंदूक लावून त्यांना मारहाण केली. त्यांच्याजवळ झोपलेल्या १० वर्ष वयाच्या नातीलाही चॉपर लावला. 'आवाज करु नको' असा दम भरला. यावेळी त्यांनी कपाट आणि तिजोरीतील सोन्याचे दागिने आणि लाखो रुपये लुटले. धुळे बाजार समितीच्या पाठीमागेच विनोद भसीन यांचा बंगला व त्यांच्या मालकीचे पंजाबी सॉ मील (वखार) आहे. वरच्या मजल्यावर त्यांचे बंधू राज भसीन राहतात. तर विनोद भसीन खालच्या बाजूला राहतात. दरोडेखोरांनी मागील बाजूचा दरवाजा तोडून अगोदर किचनमध्ये प्रवेश केला. त्यानंतर ते विनोद भसीन यांच्या बेडरुममध्ये शिरले. यावेळी हातात बंदूक, चॉपर, हत्यार घेवून घरात शिरलेल्या दरोडेखोरांना पाहून विनोद भसीन पूर्णतः बिथरले. त्यांच्या समवेत त्यांची १० वर्षीय नातही होती. तिही रडायला लागली. दरोडेखोरांनी विनोद भसीन यांच्या कानावर बंदूक लावत त्यांना बेदम मारहाण केली. तसेच त्यांच्या नातीलाही चापट मारत 'आवाज करु नको' असा दम दिला.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# खानदेशाची कुलस्वामिनी कानबाई मातेला मिरवणुकीद्वारे निरोप













धुळे । सणांचा महिना श्रावण सुरु होताच खान्देशातील ग्रामदैवत कानबाई मातेचा उत्सव मोठ्या हर्षोलासात धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यात साजरा केला जात असतो. कोकणात सर्व चाकरमाने गणपती उत्सवाला आपल्या गावाकडे परततात. त्याचप्रमाणे खानदेशात कानबाई उत्सव साजरा करण्यासाठी देश विदेशातील कुटुंबातील सदस्य घराकडे न चुकता येतात. अवघ्या दीड दिवसांचा हा सण खानदेशातील प्रत्येक कुटुंबाला एकतेचा संदेश देत वर्षभर पुरेल इतकी ऊर्जा देऊन जातो. एक दिवसाचे पाहुनी आलेल्या कानुबाई मातेला आज मोठ्या उत्साहात वाजत गाजत निरोप देण्यात आला. खानदेशातील कष्टकऱ्यांची कुलदैवत असलेल्या कानबाई मातेला शेतकऱ्यांनी पावसासाठी साकडे घातले आहे. खानदेशातील सर्वात प्रसिद्ध असे ग्रामदैवत म्हणून कानबाई मातेचा लौकिक आहे. अत्यत लोभस आणि साधं असं हे दैवत आहे. या कानबाई मातेची फक्त तीनच मंदिर आहेत. निसर्गपूरक असा हा कानबाईचा सण खान्देशात श्रावण महिन्यात नागपंचमीनंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी साजरा केला जातो. अत्यंत पवित्र आणि स्वच्छ वातावरणात सुहासिनी मातेची स्थापना करतात. कानबाई मातेची स्थापना ज्या ठिकाणी केली जाते; तिथे फुलमाळानी सजवून छोटासा गाभारा आणि मंडप तयार केला जातो. तांब्यावर नारळ ठेवलं जात त्या नारळाला नथ, डोळे लावून कानबाई मातेचे रूप दिले जाते. त्याला अलंकारांनी सजवले जाते. मातेचं हे रूप लोभस आणि देखणं राहत. आपलंस वाटणार कानबाई मातेचे हे रूप पाहण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्य आवर्जून उपस्थति राहतो. १०७ प्रकारच्या वनस्पतीं आणि सात नद्यांचे पाणी आणून कानबाईचे पूजा सजवली जाते. रविवारी स्थापन केलेल्या कानबाई मातेला सोमवारी मोठ्या उत्साहात पारंपारिक खानदेशी नृत्य फुगडी खेळत निरोप देण्यात आला. श्रावण सरींच्या हजेरीने दरवर्षी कानबाई मातेला निरोप दिला जातो. मात्र यावर्षी पावसाने दडी मारल्याने सर्वांची नजर पावसाकडे लागू नये आणि खानदेशातील कष्टकरी शेतकऱ्याने आता कानबाई मातेला पावसासाठी साकडे घातले आहे.